

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

॥ श्रीः ॥



# श्री गुरुलीलामृत

## ॥ श्रीगुरुदेव दत्त स्वामीमहाराजाय नमः ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीमत्सद्गुरु दत्तदिगंबराय नमः ॥ ॥ प्रारंभीं श्रीमंगलमूर्ति । ज्याचे योगें स्फुरे चैतन्य स्फूर्ति । ब्रह्मादिक देव असुर नर जया वंदिती । त्या नमियेलें आदरें ॥ १ ॥ मंगलाचें परम मंगल । जगद्वंद्य सावधान सुमंगल । स्मरणें ज्याचिया अमंगल । स्वप्नीं देखील दिसेना ॥ २ ॥ चतुर्दशविद्या चतुःषष्ठी कला । प्रदाता आपण आदि सकलां । संसार व्याधिच्या तिडका कला । निजकृपें समूल नाशती ॥ ३ ॥ शांत मस्तकी गंडस्थल । मद स्रवे अद्वैत ब्रह्मज्ञान निर्मल । प्रसन्न वदन सर्वकाल । विराजे सुफलित भक्तजनांसि ॥ ४ ॥ चिद्रत्नाचे अलंकार विपुल । चंद्रांकित प्रकाशमान् भाल । ज्ञान-मोदकें उदर विशाल । भरलेलें नित्य तृप्तीनें ॥ ५ ॥ 'सूक्ष्मात्सूक्ष्मतरं महत्' । अव्ययाधिष्ठान सदोदित । यास्तव 'मूषकवाहन' नाम साजत । गणाधीशा आपणांसी ॥ ६ ॥ पूर्वोत्तर मीमांसा दोन्ही । विराजती भूषणें द्वयकर्णीं । चतुर्विध पुरुषार्थ चारी पाणी । वेदवाणी सुशोभती ॥ ७ ॥ एकत्वाचा पूर्ण एकदंत । विवेक

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

परशु दिव्य झळकत। परमानंदयुक्त शुंडा झेलित। स्वात्मसुखें डुल्लत सर्वदा ॥ ८ ॥ कंठीं उपनिषदार्थ प्रकाश। साजे निज स्मरणाचा अंकुश। चरणीं सद्धर्म नूपुर गर्जतां नाश। पाखंड-मताचा होतसे ॥ ९ ॥ स्वच्छंदें करितसां तांडव नृत्य। आम्नाय अखंड वक्ते आहां सत्य। ज्ञानविज्ञान ऋद्धिसिद्धि नित्य। तिष्ठती गणराजासमीप त्या ॥ १० ॥ गजानन हेरंब लंबोदरा। विघ्नांतका सर्वविद्या-सागरा। ग्रंथ सिद्धीस नेऊनि दातारा। पूर्ण करा सविस्तर ॥ ११ ॥ ऐसें स्तवितां गजानन। तंव ते होऊनि प्रसन्न वदन। ग्रंथ सिद्ध होईल निर्विघ्न। वदती चालवी प्रियभक्ता ॥ १२ ॥ आतां भगवती सरस्वती। अनादिविद्या चिच्छक्ति। जियेचे योगें स्फुरे अंतःकरणवृत्ति। ते वंदिली प्रेमभावें ॥ १३ ॥ विलसे शुद्ध परमहंसारूढ। सारासार विवेक निगूढ। निज स्मरणें मूढ जड अमूढ। होती मूक वाचाल ते ॥ १४ ॥ अक्षर स्वर्ण वीणा शोभत। करीं पोथी वेदार्थ विहित। विरागें प्रबोध गायन करित। कल्याणार्थ जगताच्या ॥ १५ ॥ जें शब्दासी आंत बाहेर। व्यापूनि प्रतिष्ठीतसे निरंतर। निःशब्दत्व न मोडूनि साचार। अर्थविस्तार करितसे ॥ १६ ॥ मुळींचें मौन्य न मोडतां। शब्दीं दावी सत्य शब्दार्थता। या प्रकारें चालवी ग्रंथ तत्त्वता। अति श्लाघ्यता मायेची हो ॥ १७ ॥ अबोल बोल बोलवी। बोलूनि बोलणें नुरवी। अनिर्वाच्य जाड्यापहारी देवी। शुद्ध भावें संतुष्ट होतसे ॥ १८ ॥ वाचा वचन वाचकता। स्वयें होऊनि वाग्देवता। सबीज नेली कवित्व-अहंता। ऐशी प्रसन्नता जगन्मातेची ॥ १९ ॥ कामधेनूसि आदरें तृण। रत्नाकरापुढें कांच अर्पणें जाण। कुबेरासि कपर्दिका समर्पण। ज्या प्रकारें करावी ॥ २० ॥ सूर्यापुढें लाविले दीप। अमृतासि दिधलें तक्र स्वल्प। चिंतामणीसमीप शिंप। ठेविली जैशी दरिद्रें ॥ २१ ॥ तैशी माझी मंद वाणी। सरस्वती जगदंबे आपल्या स्तवनीं। विशारदे वाग्विलासिनी। विधिहरिहरादि तुज वंदिती ॥ २२ ॥ शेषासि जिव्हा सहस्र। तो जरी वर्णील अजस्र। तदपि तव गुणांचा पार चतुरस्र।

वागीशा नये कदापि ॥ २३ ॥ ऐशी जंव मी जगज्जननीं वर्णी ।. तंव ते स्तवूं नेदी पृथक्‌पणीं । वाचा वाचक स्वयें वचनीं । होऊनि वर्णवी गुरुलीला ॥ २४ ॥ ॐ नमः श्रीसद्गुरुनाथा । श्रीगुरुदेवदत्त स्वामी समर्था । पूर्णब्रह्म केवल अनादि यथार्था । आपणचि एक अद्वितीय ॥ २५ ॥ गुरु परमगुरु परात्पर गुरु दत्तात्रेय । ऋषि मुनि योगी भक्तजनांचें ध्येय । अनादि परंब्रह्माधिष्ठान अव्यय । जगदाधार असती जे ॥ २६ ॥ हरि हर देव संपूर्ण ब्रह्मादिक । हे गुरु साक्षात् परब्रह्मोपासक । दीनानाथ अनंतकोटि ब्रह्मांडनायक । सनकादिक वंदित जो ॥ २७ ॥ त्वच्चरणकमल-मकरंद । परमहंस मुक्त मुमुक्षु भ्रमरवृंद । सेविती अखंड परमानंद । करुणाकंद गुरुवर्या ॥ २८ ॥ खलदुष्टांचें निर्दलन । व्हावया साधूंचें परित्राण । धर्मसंस्थापनार्थ अवतीर्ण । होतां युगायुगीं जगदीशा ॥ २९ ॥ दशावतारादि धारण करून । वेदोक्त धर्ममार्ग सनातन । यथाविधि करवितां प्रवर्तन । वर्णाश्रम-कर्मी जनांतें ॥ ३० ॥ दुराचरण घोर कलियुगीं । होऊं लागलें जागोजागीं । म्हणून श्रीपादवल्लभरूप धरून जगीं । सदाचारीं जन लाविले ॥ ३१ ॥ मागुती श्रीमन्नृसिंह-सरस्वती । अवतरले नरवेषें यति । जनांसि लावूनि सद्धर्म नीति । असंख्यात तारिले ॥ ३२ ॥ या अवतारद्वयांचें चरित । प्रसिद्ध गुरुचरित्र ग्रंथांत । सरस्वती-गंगाधरें इत्थंभूत । वर्णिलें आहे सुरस तें ॥ ३३ ॥ पुढें कांहीं कालानें पुनरपि । घोर कलियुगीं प्राणी होऊं लागले पापी । म्हणून दत्तात्रेय ब्रह्मस्वरूपी । अवतरले नृसिंह-यतिरूपें ॥ ३४ ॥ जगदोद्धारार्थ महीवरी संचार । करिती स्वच्छंदें गुरु नृसिंहयतीश्वर । हिमाचल जगन्नाथ हरिद्वार । द्वारका गिरिनारपर्वतीं ॥ ३५ ॥ प्रयाग गया श्रीकाशी क्षेत्र । व्यंकटेशगिरि आदिक रामेश्वर । नारायणसरोवर बिंदुसरोवर । पंपासरोवर मानसादिक ॥ ३६ ॥ मातुलिंग खेटक पंढरपुर । भागीरथी गोदा कृष्णातीर । कांची द्वय आणि बदरीकेदार । अपार तीर्थें हिंडून ॥ ३७ ॥ तेचि परमात्मा नृसिंहसरस्वती । सोलापुराहूनि स्वच्छंदें पादगतीं । जगदुद्धारणार्थ

अक्कलकोटाप्रति । तिष्ठले वर्षें एकवीस ॥ ३८ ॥ तो सविस्तर कथा प्रसंग । पुढें निरूपण होईल साङ्ग । जेणें भवभय दुःख संकट भंग । झाला होईल होतसे ॥ ३९ ॥ श्रीदत्तात्रेय गुरु समर्थ स्वामी । व्यापक असंग सर्वांतर्यामी । जगद्धितार्थ वसले अक्कलकोटग्रामीं । तत्पादपद्मां नमिलें अनन्य ॥ ४० ॥ गलिताहंकृति होऊनि लीन । श्रीगुरुलीलामृत वर्णन । ग्रंथसिद्ध्यर्थ दयाळा आपलें स्तवन । करितों त्रिभुवनपालका ॥ ४१ ॥ गुरुलीला वर्णनार्थ महाराजा । निजाज्ञा झाली या चरणरजा । मंदमति मी ह्या ग्रंथरूपीं कार्यध्वजा । उभारण्यास नव्हें समर्थ ॥ ४२ ॥ तथापि आज्ञा मानूनि सर्वथा शिरीं । मस्तक ठेविलें निजचरणांवरी । सत्यप्रतिज्ञ प्रणतभक्त-कैवारी । सिद्धीस नेणार आपणचि ॥ ४३ ॥ अंतर्यामीं हृद्यीं प्रगटून । वदविता अन्य नसे समर्थावीण । साक्षी चेता केवळ निर्गुण । प्रज्ञान आनंद ब्रह्मस्वरूप ॥ ४४ ॥ लोह लागतां परिसासी । तें सुवर्ण होय शीघ्र वेगेंसीं । परंतु आपणासम लोहासी । परिसाचेनि करवेना ॥ ४५ ॥ शरणागतासी देशिक । आपणासारिखे करिती तात्कालिक । एकदेशी दृष्टान्त लौकिक । अलौकिक रूप सद्गुरु असती ॥ ४६ ॥ उपमेसि द्यावे चिंतामणि कल्पतरु । तरी अचिंत्य निर्विकल्प स्वरूप सद्गुरु । अथवा कामधेनु-दृष्टान्त धरूं । परंतु निष्काम निरिच्छ गुरु असती ॥ ४७ ॥ उपमेसि द्यावें अमृत । तरी ते अमरचि असती मर्त्य । क्षीणपुण्यें प्रवेशती मृत्युलोकांत । गुरु अद्वैत परमामृतस्वरूपी ॥ ४८ ॥ क्षीरसागरादि आटती कल्पांतीं । सूर्य प्रकाशीना रात्रौ जगतीं । चंद्र क्षयी अग्नि आदि निश्चिती । नसती अखंड प्रकाश ॥ ४९ ॥ अतएव सद्गुरु निरुपम । हेतु-दृष्टान्तवर्जित पुरुष परम । विराजती स्वयंप्रकाश परब्रह्म । परंधामस्वरूप जे ॥ ५० ॥ प्रार्थना परिसूनि झाले प्रसन्न । अंतरीं प्रगटूनि अत्रिनंदन । ग्रंथ सिद्धीस जाईल निर्विघ्न । आशीर्वचन बोलती ॥ ५१ ॥ ते गुरु ब्रह्मा विष्णु महेश्वर । आणि हरिहरांचे संपूर्ण अवतार । झाले असतील पुढें होणार । नमिले सुरवर सर्वत्र ते ॥ ५२ ॥

वेद साक्षान्नारायण । अपौरुषेय अनादि पूर्ण । स्वयंभू स्वतःसिद्ध प्रमाण । विश्वधारक असती निश्चयें ॥ ५३ ॥ वेद वेदांग- शास्त्राविण कांहीं । स्वार्थ परमार्थ होणार नाहीं । अर्थात् वेद वेदांगादि सर्वदाही । अगत्य वंदिले पाहिजे ॥ ५४ ॥ वेदवेदांगार्थ-पारग । कर्मयोग ज्ञाननिष्ठ करिती यज्ञयाग । दया-क्षमा-शांतियुक्त विराग । वंदिले ब्राह्मण ब्रह्मरूप ते ॥ ५५ ॥ वेदमूर्ति भूदेव वेदाधिकारी । मुख्य जाती ब्राह्मण निर्धारी । परमात्मस्वरूप नित्य गायत्री । हृदयीं तिष्ठे जयांच्या ॥ ५६ ॥ ते प्रसिद्ध याज्ञवल्क्य योगीश्वर । वेदव्यास महाथोर । दध्यंगाथर्वण भृगु पराशर । शुक्राचार्य कपिलमुनि ॥ ५७ ॥ भरद्वाज वसिष्ठ अत्रि विश्वामित्र । मरीचि पुलस्त्य पुलहक्रतु ब्रह्मविद्वर । जमदग्नि अगस्ति दुर्वासऋषिवर । वामदेव गौतमांगिरस ॥ ५८ ॥ पौतिमाषि मुद्गल वत्स कौशिक । कण्व लोमेश मार्कंडेय मांडुक । कश्यप नारद शुक शौनक । वाल्मिक वैशंपायन सूतादि ॥ ५९ ॥ सनक सनंदन सनत्कुमार । सनक सुजात धौम्य जैमिनी विद्वर । आश्वलायन गर्ग पतंजल योगसूत्रकार । धारण्य दलादनादिक ॥ ६० ॥ जाबाल उद्दालक गौपवन । शांडिल्य सैतव अरुण कात्यायन । नैध्रुव कौंडिण्य आदि करून । नमिले बृहस्पति सुरगुरु ॥ ६१ ॥ इंद्र चंद्र अग्नि दिवाकर । पृथ्वी वायु तेज नीर । यम वरुण दिक्पाल कुबेर । वंदिले सुरवर ग्रहादिक ॥ ६२ ॥ अवतार श्रीमच्छंकराचार्य । धर्मसंस्थापक वेदविज्ञानसूर्य । प्रस्थानत्रय-भाष्यकारवर्य । ते जगद्गुरु वंदिले ॥ ६३ ॥ विद्यारण्य श्रेष्ठ संन्यासी । वेदभाष्यादिक निर्मिली पंचदशी । शंकरानंद श्रीधर मधुसूदनादिकांसी । संस्कृत टीकाकारांसि वंदिले ॥ ६४ ॥ कालिदास कवि श्रेष्ठ । दंडी बाण भवभूति वरिष्ठ । जयदेवकवि धोयादिक ज्येष्ठ । नमिले विद्वज्जन पंडित ते ॥ ६५ ॥ कवि हरि अंतरिक्ष महान् । प्रबुद्ध पिप्पलायन । द्रुमिल आविर्होत्र चमस करभाजन । वंदिले नवयोगींद्र ते ॥ ६६ ॥ मत्स्येंद्र गोरक्षादि नवयोगी । जपी तपी कर्मी संन्यासी विरागी । ब्रह्मचारी गृहस्थ वनस्थ विरक्त भोगी । ते सकल वंदिले ॥ ६७ ॥ श्रोते

प्राकृत कवि संत सज्जन । मुकुंदराज सत्पुरुष ज्ञानवान् । निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर सोपान । मुक्ता जाण ब्रह्मकला ॥ ६८ ॥ नामदेव तुकाराम दत्त जनार्दन एकनाथ । मुक्तेश्वर जयदेव जयराम रंगनाथ । रामदास अमृतराय दासोपंत । देवनाथ दामाजीपंत माधवदास । शिवरामस्वामी ॥ ६९ ॥ चांगदेव कान्हा नरहरि सूरदास । शिवदिनकेसरी तुळशीदास । गोरा सांवता बल्लव दादूसुत रोहिदास नरसीमेहता ॥ ७० ॥ केशवनाथ मध्वमुनेश्वर । रामनाथ आनंदतनय वटेश्वर । उद्धवचिद्घन कबीर । विसोबा खेचर सोयरा तो ॥ ७१ ॥ मयूरपंत वामनपंडित । रामजोशी रामानंद मानपुरी अनंत । मिरा निरा कृष्णा जनाबाई । त्र्यंबक रघुनाथ । निरंजन निपटनिरंजन ॥ ७२ ॥ निश्चलदास विठ्ठल सजनकसाई । हंसराज सत्कवि प्रख्यात । विठ्ठलपुरंदर मोरया गोसावी । श्रीधरस्वामी नाझरेकर ॥ ७३ ॥ माणिकप्रभु जयराम यशवंत । बाळकृष्ण गंगाधर देवनाथ । संत अनंत नमियेले ॥ ७४ ॥ आतां वंदूं मातापिता । कुलदेवतादि ग्रामस्थान वास्तुदेवता । ज्यांचे कृपें इहपर साध्य तत्वतां । होय सर्वथा निर्धारें ॥ ७५ ॥ दक्षिणेंत महाराष्ट्रदेशीं । अहमदनगर-निवासी । नगरकरवैद्य म्हणती जयासी । धारण्य गोत्री यजुर्वेदी ब्राह्मण ॥ ७६ ॥ निष्णात वैद्य जगत्प्रसिद्ध । माणिक नामें झाले सिद्ध । सदाचारी वैदिक शुद्धबोध । जे अविरोध विरागी ॥ ७७ ॥ माणिक वैद्याचे दोन कुमर । एक भट्टवैद्य दुसरे मोरेश्वर । उभयतांसि प्रसन्न निरंतर । जगदंबा श्रीशंकर असती ॥ ७८ ॥ शके सोळाशें तिहींत । पुस्तकें रचिलीं वैद्यकादि संस्कृत । त्यांतील प्रसिद्ध वैद्यामृत । मोरेश्वररचित असे जें ॥ ७९ ॥ भट्टवैद्यास होते चार नंदन । त्यांत श्रेष्ठ नारायण विद्वान । तयासि श्रीजगदंबा प्रसन्न । बोले चाले तत्संगें ॥ ८० ॥ सप्तशृंगनिवासिनी जगन्माता । औषधी आणून देई स्वतः । जहागीर मोकासे मिळवूनि तत्त्वतां । साक्षात्कारी जाहले ॥ ८१ ॥ नारायणासि पुत्र त्र्यंबक । जाहला प्रसिद्ध कुलदीपक । ब्रह्मज्ञानी होऊनि निःशोक । वाल्मीक ग्रामीं वसतसे ॥ ८२ ॥ वाल्मीक ऋषींचें आहे स्थान । वाल्मीकतीर्थ सुंदर असे महान । म्हणून त्या ग्रामासि सर्व

जन। बाहती 'वामोरी' ऐशा नामें ॥ ८३ ॥ ते त्र्यंबक प्रातः प्रति भौमवारीं। सप्तशृंगीं आणि त्र्यंबकेश्वरीं। दर्शन औषधी घेऊनि माधरीं। स्वसदनीं येती सायान्हीं ॥ ८४ ॥ शिवशक्तीची पूर्ण कृपा। षोडशयोजन मार्ग झाला सोपा। समत्वें देखती रंकनृपा। स्वानंदीं निमग्न झाले ते ॥ ८५ ॥ त्र्यंबक वैद्याचे पुत्र विठ्ठल। ज्योतिर्वैद्य जाणते निर्मल। समाधानी विवेक-कुशल। पुण्यशील झाले ते ॥ ८६ ॥ विठ्ठलापासूनि रावजीभट्ट। करूनि अनेक तीर्थयात्रा श्रेष्ठ। वेदोक्त मार्गीं भक्त अवीट। तेचि असती जनक वामनाचे ॥ ८७ ॥ कौंडिण्य गोत्री महादेव द्विज। त्यांचे पुत्र गुंड नामें ध्वज। तयांचे चिरंजीव त्र्यंबकराज। कोलग्राम निवासी ॥ ८८ ॥ 'तरडे' इति उपनाम। यजुर्वेदी ब्राह्मण देवभक्त निस्सीम। आचारविचार धर्मसंपन्न। वैदिक मार्गें वर्तती ॥ ८९ ॥ पुत्र कन्या तयांसि चार। त्यांत अहल्या नामें सती थोर। तियेचे उदरीं जन्मलों साचार। त्रयबंधु-भगिनींसह ॥ ९० ॥ एवं पूर्वजादि मातापिता। मंगलार्थ वंदिलीं शिष्टाचाराकरितां। पुढें वंदूं कुलदेवता। श्रोतीं सावधान असावें ॥ ९१ ॥ पूज्य आमुचे वंशांत। त्र्यंबकेश्वर गिरिजाकांत। सृष्टि स्थिति संहार करित। शिव अनंत अपार जो ॥ ९२ ॥ श्रीसप्तशृंगनिवासिनी। जगदंबा प्रणवरूपिणी। आदिमाया कुलस्वामिनी। योगीजनांचें ध्येय जी ॥ ९३ ॥ इडा ब्रह्मरूप वाम नासिकीं। दक्षिण पिंगला विष्णुरूप कीं। पुढें सुषुम्णा रुद्ररूप त्र्यंबकीं। सोहं-हंसस्वरूपता आहे ॥ ९४ ॥ त्रिकुट श्रीहट गोल्हाट। रक्त श्वेत शामरूप वर्णत्रय स्थान श्रेष्ठ। आणि नीलबिंदु तें औटपीठ। वरी भ्रमरगुंफा विराजित ॥ ९५ ॥ त्या दशमद्वारीं गुरुत्र्यंबक। त्यांचें दर्शन घेती पारमार्थिक। नवमद्वार नाडी वायुमार्गें अनेक। भेदूनि जाती भाग्यवान ॥ ९६ ॥ किंवा स्थूल सूक्ष्म देह कारण। या देहत्रयातीत साक्षी शिवाख्य पूर्ण। अकार उकार मकार यांहून। अर्धमात्रापर त्र्यंबकब्रह्म प्रकाशित ॥ ९७ ॥ याप्रकारें नादबिंदुकलातीत। निरुपाधिक शिवाख्य ब्रह्म अनंत। त्या व्यापक ब्रह्मगिरींतून सदोदित। ज्ञानगंगा प्रवाहे ॥ ९८ ॥

त्या गंगाद्वारीं नित्य करूनि स्नाना । ब्रह्मगिरीची निःसंशय प्रदक्षिणा । करितां ब्रह्मस्वरूप होय जाणा । जीव
जन्ममरणाविरहित तो ॥ ९९ ॥ अघटितघटनापटीयसी । महामाया सप्तशृंगनिवासी । करी उत्पत्ति-स्थिति-प्रलयासी ।
जगन्माया चिच्छक्ति ही ॥ १०० ॥ अनामासि नाम ठेविलें । अरूपासि रूप आणिलें । मूळ पुरुषासि खेळविलें । ऐसें
कर्तृत्व ह्या चैतन्यशक्तीचे ॥ १ ॥ तूर्या ब्रह्म-त्रिपुरसुंदरी भुवनेश्वरी । अजा एक अनंत ब्रह्मांडोदरीं । होती
जाती वरचेवरी । परी हे कुमारी तिष्ठतसे ॥ २ ॥ इच्छा हे परमपुरुषाची । नानाविध ब्रह्मांडें खेळ रची ।
खेळांत हरिहरविरंची । नाचवी सकल जीवांसि ॥ ३ ॥ कर्म उपासना पायऱ्या वेंघुनी । मग पहावी हृदयांतरीं
विश्वजननी । चित्कला ब्रह्मविद्याविकासिनी । सर्वसाक्षी-स्वरूप ती ॥ ४ ॥ सप्तम भूमिकारूप सप्तशृंग ।
बीजरूप मंत्रदेवता अभंग । तिष्ठती सर्वांगीं यथासांग । निजरंग उदय होतसे ॥ ५ ॥ करूनि नवविधाभक्ति
नवरात्र । नित्योत्सव-नित्यश्री-मंगल पवित्र । शृंगावरी भक्तबोध वस्तुतंत्र । लाविती निशाण ध्वजा एकत्वें
॥ ६ ॥ फडकती स्वात्मानंद वायुवेगें निशाणें । ते मूलध्वजस्तंभ पालवी खुणें । मुक्त मुमुक्षु साधकांकारणें ।
परमात्म अभेद दर्शनार्थ ॥ ७ ॥ एवं शिवशक्ति कुलदेवता । वंदिली प्रेमें परमार्थता । उदयोऽस्तु उदयोऽस्तु
निर्भयता । वदती ग्रंथ आरंभिजे ॥ ८ ॥ नवसा पावूनि सार्थकता । नवल करितसे कुलदेवता । कुलाकुलादिक
व्याकुलता । नेली अहंता समूल ॥ ९ ॥ ग्रंथारंभीं देवतावंदन । शिष्टाचार प्रवृत्तिजनन । परंपरा मंगलाचरण ।
अवश्य केलें पाहिजे ॥ ११० ॥ म्हणूनि वंदूं श्रोते सज्जन । हरिगुरुभक्तिपरायण । अध्यात्मश्रवणीं
सावधान । असती नवविधभजनीं प्रिय जे ॥ ११ ॥ श्रोते ब्रह्मविद्येचें माहेर । तथापि सच्छास्त्र श्रवणार्थातुर ।
श्रोते तुम्ही रसज्ञपणाचें भांडार । विवेकचतुर आहां कीं ॥ १२ ॥ लांबविलें देवता स्तवनास । अतएव

श्रोते व्हाल उदास । अनवधानें सर्व विरस । न व्हावें म्हणून विनवितों ॥ १३ ॥ तंव श्रोते बोलती सप्रेम । एकमेवाद्वितीय ब्रह्म । कोणीं कोणाचें स्तवन । प्रथम येथें करावें ॥ १४ ॥ हें स्तवन कीं स्वात्मानुभव । परिपाक कीं प्रमेयभाव । सिद्धान्त कीं अर्थगौरव । अद्वैतवैभव वाटतसे ॥ १५ ॥ तृप्तीचे ढेंकर जेवणार देती । तैसे तुमचे बोल निश्चितीं । परमामृतासम आम्हांप्रति । मधुर वाटती गुरुदासां ॥ १६ ॥ गणेश सरस्वति गुरु देवता । कवि श्रोते इत्यादिकां एकत्वें संतां । एके ताटीं बैसविलें परमार्थता । हे मर्यादा विशेष ॥ १७ ॥ आधींच आम्ही श्रवणातुर । गुरुलीलामृतपान त्याहीवर । दत्तात्रेयस्वामीकृपें सविस्तर । चालवीं सत्वर ग्रंथ-रचना ॥ १८ ॥ ऐसे सर्वत्रांचे आज्ञानुसार । ग्रंथ आरंभिला गुरुलीलामृत-सागर । सत्संकल्पसिद्धि-प्रदातार । पूर्ण करील त्याचा तो ॥ १९ ॥ 'श्रीगुरुलीलामृत' । ग्रंथाचें नाम ठेविलें प्रख्यात । गुरुशिष्यसंवादरूप अद्भुत । श्रुतिशास्त्रसंमत असे हा ॥ १२० ॥ कर्म उपासना वैराग्य भक्ति ज्ञान । राजयोग हटयोगादि साधन । अनेक विषयप्रतिपादन । अत्रिनंदन करविता ॥ २१ ॥ आतां 'साधन-चतुष्टय' । तैसेचि 'अनुबंध-चतुष्टय' । ग्रंथारंभीं सांगूं शास्त्राभिप्राय– । सह सुलभत्वें कळावया ॥ २२ ॥ स्ववर्णाश्रमधर्मैंकरूनी । कृच्छ्र चांद्रायणादि तप आचरुनी । वेदविहित प्रायश्चित्त घेउनी । संतोषवावें हरीतें ॥ २३ ॥ निष्कर्म भगवत्प्रीतिकर । सर्व-भूतदया-लक्षण साचार । आणि वैराग्यादि साधनचार । मोक्षसाधक धर्म आहेत ते ॥ २४ ॥ ब्रह्मलोकादि मर्त्यलोकांच्या अंतीं । पर्यंत विषयोपभोग साधनें जीं असतीं । त्या विषयभोग-साधनांत निश्चिती । कर्मजन्यत्व आणि अनित्यत्व जाणावें ॥ २५ ॥ तेंचि शुद्ध वैराग्य निर्मल । विषयेच्छाराहित्य जाणावें चिरकाल । यथा काकविष्ठा म्हणिजेल । दृष्टान्त स्पष्ट अस्पर्श असे ॥ २६ ॥ गर्दभादिविष्ठा ज्वरशांत्यर्थ । ग्रहणेच्छा होते कदाचित । म्हणूनि काकविष्ठेचा दृष्टान्त ।

घेतला स्पष्ट उमजावया ॥ २७ ॥ काकविष्ठा उपलक्षण अमंगल । देखतां वांति आदिक चिळस येते तात्काळ । स्पर्श करण्यास योग्य देखिल । काकविष्ठा नसेचि ॥ २८ ॥ तैसेचि विषयभोग कर्मजात । अमंगळ अशुचि साधनसहित । अनित्य जड असूनि करिती अंत । वारंवार जीवाचा ॥ २९ ॥ अत्यंत विरस विशुष्क विषय । त्यांत रमतां सर्वोपरी होतो क्षय । म्हणूनि सर्वदा अति विषमय । असती विषय घातक हे ॥ १३० ॥ अर्थात् न होऊं द्यावा विषयेच्छाउदय । म्हणजे चित्त रागादि-मलरहित होय । तेंचि विषयेच्छाराहित्य निरामय । 'वैराग्य' निर्मल म्हणावें ॥ ३१ ॥ त्या निर्मल वैराग्याचें कारण । नित्यानित्यविवेकचि मुख्य जाण । त्या मुख्य विवेकाचें सशास्त्र लक्षण । सांगूं सर्वांसी कळावया ॥ ३२ ॥ संपूर्ण विद्वदनुभव प्रसिद्ध । आत्मस्वरूप सत्य नित्य शुद्ध । अविनाशी हृदयीं सर्वदा उपलब्ध । त्रिकालाबाध्य अद्वितीय असे ॥ ३३ ॥ याहून देह अमंगल विपरीत । जड दृश्य बाध्य मिथ्या नाशिवंत । क्षणभंगुर अनित्य अशुचि असत । जन्मजरामरणयुक्त असे हा ॥ ३४ ॥ ब्रह्मादि-स्थावरान्त सर्व । स्वर्गादि लोकींचें भोगवैभव । अनात्मस्वरूप ऐसा अनुभव । आहे सर्वांसी उघडपणें ॥ ३५ ॥ जैसे घटादिक पदार्थ व्यतिरेकीं केवल । तैसा देह अशाश्वत चंचल अमंगल । विष्ठामूत्राद्दियुक्त अनेक मल विटाळ । नखें लोम केशादि टाकित ॥ ३६ ॥ आणि आत्मा पुण्यस्वरूप सर्वकाल । नित्यश्री आहे नित्यमंगल । अखंडित शाश्वत अज निश्चल । असे सच्चिदानंदस्वरूप ॥ ३७ ॥ हाचि 'नित्यानित्यवस्तुविवेक' । वैराग्याचें मुख्य कारण सम्यक । सांगितलें आतां शिष्या ऐक । वैराग्य कार्य 'शमादिषट्क' ते ॥ ३८ ॥ सदैव वासना परित्यागणें । म्हणजे पूर्वसंस्काराची उपेक्षा करणें । अंतःकरण निग्रह करून जिंकणें । 'शम' शब्दार्थ बोलिला हा ॥ ३९ ॥ श्रोत्रवागादिक इंद्रियांचा । निग्रह कीजे बाह्य प्रवृत्तीचा । तिरस्कार निषिद्ध प्रवृत्तीचा । करणें तो 'दम' शब्दार्थ कथियेला ॥ १४० ॥ शब्द स्पर्श रूप रस

गंध बंधक। या पंचविषयांची निवृत्ति करणें आवश्यक। विषयग्रहण अनिच्छा अनित्यत्वादिक। दोषदृष्टीनें करणें जी ॥ ४१ ॥ म्हणजे विषयेच्छेची समूल निवृत्ति। करणें तीच बोलिजे योग्य 'उपरति'। कैशी आहे श्रवण करावी ती। उपरति-साधक जनांनीं ॥ ४२ ॥ परम उत्कृष्ट आत्मज्ञान। उत्पन्न होय जिच्यापासून। ऐशी उपरति ब्रह्मज्ञान। साधनभूत आहे ती ॥ ४३ ॥ इचे योगें सर्वकर्मसंन्यास। झाला पाहिजे गुरुकुलवास। तरीच तितिक्षा-प्राप्तीस। योग्य होतसे साधक तो ॥ ४४ ॥ जें सहन सर्व दुःखांचें। आणि सर्व दुःखांच्या साधनांचें। करणें शितोष्णादि द्वंद्वांचें। अप्रतिकारपूर्वक ॥ ४५ ॥ हीच 'तितिक्षा' शास्त्रोक्त। शुभ सुखरूप असे निश्चित। सकल विदुषां संमत। द्वंद्वादि सहन करणें तें ॥ ४६ ॥ वेद-स्वगुरु-वचनाच्याठायीं। म्हणजे उपनिषदार्थ-उपदेशीं सर्वदाही। भक्तिपूर्वक दृढतर विश्वास राही। तीच वेदान्तप्रसिद्ध 'श्रद्धा' जाणावी ॥ ४७ ॥ परब्रह्म जें प्रत्यगभिन्न। त्या ब्रह्मस्वरूपांत चित्त एकाग्र संलग्न। तदेकजिज्ञासा तद्रूप-चिंतन। त्यासीच 'समाधान' बोलती ॥ ४८ ॥ याप्रकारें विवेक वैराग्य शमादि षट्क सांगून। तत्कार्यभूत मुमुक्षुपण। सुटावया संसारबंधन। मुमुक्षु अधिकारी सांगू तो ॥ ४९ ॥ हे कर्त्या करवित्या परमेशा। कैशी माझी असे प्रारब्धदशा। ह्या दुस्तर संसारपाशा। वेगळा केव्हां होईन मी ॥ १५० ॥ केव्हां संसारबंध-निर्मुक्ति। नानायोनिसंबंध-निवृत्ति। कोणत्या कालीं कोणत्या युक्तीं। होईल ऐसी जिज्ञासा ॥ ५१ ॥ ऐशी बुद्धि बाणली दृढतर। तीच 'मुमुक्षुता' जाणावी मुक्तिकर। ही मुमुक्षुता ज्याचे अंगीं निरंतर। बाणली तोचि मुमुक्षु म्हणावा ॥ ५२ ॥ 'नित्यानित्यवस्तुविवेक'। 'इहामूत्रफलभोग विराग' सम्यक्। 'मुमुक्षुता'सह 'शमादिषट्क'। हें साधनचतुष्टय निरूपिलें ॥ ५३ ॥; आतां जें 'अनुबंधचतुष्टय'। सांगू त्यांतील प्रथम विषय। गुरुलीलामृतात्मरूप तत्त्व नित्य। हाचि 'विषय' जाणावा ॥ ५४ ॥ ब्रह्मात्मसाक्षात्कारानुभव ज्ञान। गुरुशिष्यसंवाद सिद्धान्तरहस्य प्रदर्शन।

शंका निराकरणपूर्वक समाधान । प्रकरणेंकरून 'विषय' हा ॥ ५५ ॥; सांगूं 'प्रयोजन' म्हणजे काय । उपयोग कारण काम विषय । येथें गुरुभक्तीनें मोक्षसिद्धि प्रयोजन होय । अनुबंधांतील दुसरें तें ॥ ५६ ॥ मोक्ष म्हणजे मोकळें बंधमुक्त । अनात्म देहादि स्व अविद्या-कल्पित । त्या अनात्म देहादिकीं मोहयुक्त । आत्मत्वाभिमान धरणें जो ॥ ५७ ॥ तो अनात्मत्वाभिमानचि 'बंध' । तन्निवृत्तिद्वारें होय ब्रह्मविद्या बोध । नुरे देहाभिमान अनर्थद लेश गंध । तेव्हां स्वस्वरूपावस्थान सिद्धि होते ॥ ५८ ॥ होऊनि सर्वानर्थ सबीज निवृत्ति । हृदयीं होय नित्य स्वस्वरूपप्राप्ति । 'परमानंद प्राप्तिरूप' जाणावी ती । 'मोक्षसिद्धि' प्रयोजन तें ॥ ५९ ॥; आतां परिसा हो श्रोतेजन । मुमुक्षु मोक्षाधिकारीगुरुभक्तिमान । नित्यानित्यविवेकादि करून । साधनचतुष्टय संपन्न जो ॥ १६० ॥ वेदविहित निष्काम कर्मे करून । शुद्ध झालें जयाचें अंतःकरण । प्रपंच संसारीं विटलें मन । विषयभान गळालें ॥ ६१ ॥ दीर्घकालाभ्यास वारंवार । परमार्थास्तव प्रयत्न करी निरंतर । उदासीन हरिभक्ति प्रियकर । जाणावा 'मोक्षाधिकारी' मुमुक्षु तो ॥ ६२ ॥ परमार्थावांचून इतर । कार्यांचा करितसे अनादर । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ श्रीगुरुवर । केव्हां भेटेल कृपाळु तो ॥ ६३ ॥ त्या सद्गुरुमुखें वेदवेदान्त । उदनिषद्-रहस्य ब्रह्मसिद्धान्त । महावाक्यार्थज्ञान सदोदित । केव्हां प्राप्त श्रवण होईल ॥ ६४ ॥ तें गुरुमुखें वेदान्तार्थ-श्रवण । त्या श्रवणार्थ-निश्चयें होऊनि मनन । त्या मनननिदिध्यासें साक्षात्कारसंपन्न । गुरुकृपें केव्हां होईन मी ॥ ६५ ॥ ऐशी लागली जया तळमळ । तोचि मुमुक्षु म्हणावा निर्मल । परमेश्वर-गुरु-अनुग्रहासि पात्र केवळ । त्यावरीच कृपा होतसे ॥ ६६ ॥; ह्याच अर्थी पूर्वोत्तर ग्रंथकांडाचा । साध्यसाधनभाव जो साचा । तोचि 'संबंध' जाणावयाचा । अनुबंधचतुष्टयांतील चतुर्थ ॥ ६७ ॥ संस्कृत ग्रंथाची सरणी पद्धत । तैशीच रचिती सुकवि प्राकृतांत । म्हणूनि साधनचतुष्टयसहित । अनुबंधचतुष्टय आद्य निरूपिलें ॥ ६८ ॥ ग्रंथभाषा प्राकृत म्हणून । कंटाळतील विद्वज्जन ।

तथापि एकचि अर्थानुसंधान । संस्कृत-प्राकृतीं जाणावें ॥ ६९ ॥ दोन्ही चरणीं एक गति । एक क्रिया आहे दोन्ही हातीं । एक शब्दनाद द्वय श्रवणांप्रति । द्वय अधरपुटीं एक शब्द निघे ॥ १७० ॥ एक दृष्टि दोन्ही नयनीं । एक अर्थ भाषा दोन्ही । लौकिक वैदिक उभय वचनीं । उदक पाणी अर्थ एक जैसा ॥ ७१ ॥ वांकडा दिसे कृष्ण श्वेत ऊंस । परी गोडी वसे सर्वांगीं सुरस । शर्करेचें वृंदावन सकळांस । कडू न लागे कदापि ॥ ७२ ॥ समुद्रीं भरलें जरी क्षारोदक । तें उष्णकालीं मेघमंडलीं संस्कारपूर्वक । अमृनि पर्जन्यकालीं सुखकारक । मधुर रुचिकर होऊनि वर्षे ॥ ७३ ॥ समुद्रीं भरलें क्षारोदक । परी त्यांतून रत्नें मौक्तिकें अमोलिक । निघतीं कैशीं सुंदर देख । तैशीं प्राकृतीं शब्दार्थरत्नें मुक्तादि ॥ ७४ ॥ मधुमक्षिका मुखांतील मध । मृगनाभींतील घेती कस्तुरी सुगंध । देवादिकांसि प्रिय असे शुद्ध । तैसें प्राकृत रसिकांसि ॥ ७५ ॥ काकविष्ठेचे होती पिंपळ । परंतु पूजिती प्रेमें सर्वकाळ । तैसें प्राकृत संस्कृत निवळ । शब्दार्थ फळ एकचि आहे ॥ ७६ ॥ ईश्वरें संस्कृत निर्माण केलें । आणि प्राकृत चोरांनीं आणिलें । ऐसें बोलणेंचि अप्रशस्त तें भले । समदर्शी न मानिती कदा ॥ ७७ ॥ परीक्षा गोडी मुख्यत्वें । हें तरी आहे अधिकारपरत्वें । जाणती अद्वेष सत्य रसज्ञत्वें । शुद्ध तत्त्वज्ञ पुरुष ते ॥ ७८ ॥ येथें द्वेष अहंकार सुटावे । वादविवाद दुःखद कलह तुटावे । संशय विटाळ सर्व फिटावे । तरीच होय जन्मसार्थक ॥ ७९ ॥ असो गुरुसंतति कुलश्रेष्ठ । अत्रिऋषि मूलपीठ । तेथून दत्तगुरु योगविद्वरिष्ठ । झाले प्रगट परमेश्वर ॥ १८० ॥ तो कथा प्रसंग रसाळ । पुढील द्वितीयाध्यायीं सकळ । गुंफियला श्रोतृजनीं निर्मळ । मानसेंकरूनि परिसावा ॥ ८१ ॥ स्वति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्र पुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । मंगलाचरणाध्याय प्रथम हा ॥ १८२ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे ‘ देवतावंदनं ’नाम प्रथमोध्यायः समाप्तः ॥ १ ॥ ॥ ॥